RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग दोन

वर्ष ६, अंक ४७] बुधवार, डिसेंबर ९, २०२० /अग्रहायण १८, शके १९४२ [पृष्ठे २, किंमत : रुपये १२.००

## असाधारण क्रमांक ६८

## प्राधिकृत प्रकाशन

## ठाणे महानगरपालिका, ठाणे

## शहर विकास विभाग

### जाहीर सूचना

(महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये)

क्रमांक ठामपा/मुख्या.१/शविवि-२९/वियोअंक/६६४

ज्याअर्थी, ठाणे शहराची सुधारित विकास योजना शासन निर्णय क्र. टीपीएस/१२९७/१३१९/सी.आर-१४८/९७/नवि-१२, दि. ४ ऑक्टोबर, १९९९ अन्वये मंजूर असून, २२ नोव्हेंबर १९९९ पासून अंमलात आली. तसेच सुधारित विकास योजनेतील वगळलेले क्षेत्र (Excluded portion) शासन निर्णय क्र. टीपीएस / १२०१/ २७४/ सीआर-२८/२००९/नवि-१२, दि. ३ एप्रिल, २००३ अन्वये मंजूर झाली असून दि. १४ मे, २००३ पासून अंमलात आली आहे. (यापुढे "उक्त मंजूर विकास योजना" असे संबोधिले आहे.) ;

आणि ज्याअर्थी, सेक्टर क्र. ४ मधील मौजे माजिवडा येथील स.क्र. ३१८(पै) वरील महापालिकेस प्राप्त सुविधा भूखंडावर शाळेचे विकसन सुरू आहे. उक्त सुविधा भूखंडास जाणारे रस्ते हे लगतच्या गृहनिर्माण प्रकल्पामधून जात असल्यामुळे तेथील रहिवाशांनी भविष्यात अपघाताच्या घटना टाळण्याकरिता गृहनिर्माण प्रकल्पाबाहेरून रस्ता घेण्यास विनंती केली आहे. त्यामुळे मुख्य ४०.०० मी. रुंद विकास आराखड्यातील रस्त्यापासून HCMTR अंतर्गत २०.०० मी. रुंद रस्ता सुविधा भूखंडापर्यंत निवासी भागातून प्रस्तावित करण्यात येत आहे. त्यानुसार मौजे माजिवडे स.क्र. ३१८(पै), ३१९(पै), ३२१(पै) ह्या भूखंडावरील निवासी भागात फेरबदल करून व HCMTR अंतर्गत २०.०० मी. रुंद रस्ता दर्शविणेकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये फेरबदल प्रस्तावित करणे आवश्यक आहे. त्यानुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) नुसार फेरबदलाची कार्यवाही करणेस मा. महासभा ठराव क्र. २९३, दि. २०.११.२०१९ अन्वये मान्यता दिलेली आहे (यापुढे "उक्त फेरबदल" असे संबोधिले आहे.) ;

आणि त्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) मधील तरतुदीनुसार "उक्त मंजूर विकास योजनेत" "उक्त फेरबदलाबाबत" आम जनतेच्या सूचना / हरकती मागविणेसाठी ही जाहीर सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे. उक्त फेरबदल दर्शविणारा नकाशा सहायक संचालक, नगररचना, ठाणे महानगरपालिका, "महापालिका भवन", जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे यांचे कार्यालयीन सूचना फलकावर व खाली नमूद केलेल्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. उक्त फेरबदलाबाबत कोणत्याही व्यक्तीस सूचना / हरकती घ्यावयाची असल्यास त्यांनी ही सूचना वृत्तपत्रात व www.thanecity.gov.in या संकेत स्थळावर आणि **महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात** प्रसिद्ध झाल्यापासून ३० (तीस) दिवसांचे आत आपली सूचना / हरकत महापालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांचेकडे अथवा E-mail ID- adtp@thanecity.gov.in वर सादर करावी.

संकेत स्थळ :- www.thanecity.gov.in

**श्रीकांत देशमुख,**
सहायक संचालक, नगररचना,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

ठाणे,
दिनांक २५ नोव्हेंबर २०२०.

## THANE MUNICIPAL CORPORATION, THANE

### TOWN PLANNING DEPARTMENT

### Notice

(U/S. 37 OF MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966)

NO. TMC Hq. 1 / TDD-29 / DPIC / 664

Whereas, the Revised Development Plan of the city of Thane has been Sanctioned by Government *vide* Notification No. TPS/1297/1319/CR-148/97/UD-12, dated 4th October, 1999 and came in to force from 22nd November, 1999. Also the Development Plan for Excluded portion (EP) from Revised Development plan was sanctioned *vide* Government's Notification No. TPS/1201/274/CR-28/2009/UD-12, dated 3rd April, 2003 and came in to force from 14th May, 2003 (hereinafter referred to as "The said Sanctioned Development plan") ;

And whereas, development of school has been started on the amenity plot handed over to Thane Municipal Corporation in sector No. 4, bearing survey No. 318(pt.). Since the road leading to this amenity plot is passing through the adjacent residential projects, the residents have requested to realign the road outside the residential projects, to avoid accidents in the future. Hence internal 20.00 mt. wide road under HCMTR from 40.00 mt. wide D.P. road upto the amenity plot is proposed through residential zone and it is necessary to propose modification in residential zone on land bearing Survey No. 318(pt.), 319(pt.), 321(pt.) at Village Majiwade, for showing 20.00 mtr. wide road and further 20.00 mtr. wide road under HCMTR as per the section 37(*1*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, Hon. General Body of Thane Municipal Corporation has accorded sanction for proposed modification as per the section 37(*1*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, *vide* it's resolution No. 293, dated 20.11.2019 (hereinafter called as 'Said Modification') ;

And therefore, this notice is published for inviting suggestions/objections from the public to carry out "The Said Modification in The said Sanctioned Development Plan" as per the provisions under section 37(*1*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. The Plan showing "The said modification" is displayed on the notice board in the office of Assistant Director, Town Planning, Town Development Department, Thane Municipal Corporation, "Mahapalika Bhavan", General Arunkumar Vaidya Marg, Chandanvadi, Panchpakhadi, Thane and also published on web site mentioned below. Any person who wants to submit suggestion may submit his suggestion or objection to the said modification within 30 (Thirty) days from the publication of this notice in the news paper, on the website www.thanecity.gov.in and *Maharashtra Government Gazette*, to the Municipal Commissioner, Thane Municipal Corporation, Thane or on the E-mail ID - adtp@thanecity.gov.in

Web Site - www.thanecity.gov.in

SHRIKANT M. DESHMUKH,

Thane,
dated 25th November 2020.

Asst. Director, Town Planning,
Thane Municipal Corporation, Thane.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.